महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८० वा | दिनांक : २१/१२/२०२४ | वार : शनिवार

# एकनाथ शिंदेंचा नाराजांना श्रद्धा सबुरीचा संदेश



**नागपूर :** विधानसभा निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमत मिळवत सत्ता स्थापन केली. त्यानंतर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधी तसेच हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्र्यांचा देखील शपथविधी पार पडला. मात्र, महायुतीमधील घटकपक्षांमधील काही आमदारांना मंत्रिपद मिळाले नसल्याने नाराजीनाट्य देखील पाहायला मिळाले आहे. शिवसेना शिंदे गटातील अनेक आमदार नाराज असल्याची चर्चा आहे. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले, पदे येतात जातात. ज्यांना मंत्रिपद दिले त्यांच्यात क्षमता आहे आणि ज्यांना दिले नाही त्यांच्यात क्षमता नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आमच्याकडे संख्या जास्त आहे, काहीवेळा काही लोकांना श्रद्धा आणि सबुरी ठेवावी लागते, असे शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, जे आमदार आता पहिल्या टप्प्यात मंत्री बनले नाहीत, ते पक्षाचे आणि संघटनेचे काम करतील. त्यांना दुसऱ्या टप्प्यात संधी देऊन पहिल्या टप्प्यातील आमदारांना तेव्हा पक्षाचे काम करायला सांगू. हे रुटीन आहे आणि हीच कामाची पद्धत आहे, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्या टप्प्यात आमदारांना मंत्रिपदाची संधी मिळणार असल्याचे सूचित केले आहे.

दरम्यान, विजय शिवतारे आणि प्रकाश सुर्वे तसेच नरेंद्र भोंडकर यांनी देखील त्यांची नाराजी उघडपणे व्यक्त केली होती. यावर एकनाथ शिंदे म्हणाले, विजय शिवतारे यांनी येऊन मला सांगितले की एकनाथ शिंदे यांचा विश्वासू सहकारी या पदाशिवाय मला दुसरे काही नको. हेच सर्वात मोठे पद आहे. प्रकाश सुर्वे हे देखील मला येऊन भेटले आहेत. नरेंद्र भोंडेकर यांनीही मला येऊन सांगितले आहे. पण हे लोक आता पुन्हा जोमाने काम करणार आहेत. आमची जबाबदारी आता वाढली आहे, असे शिंदे म्हणाले.

पदे येतात आणि जातात, पदापेक्षा आपले उत्तरदायित्व आपले लोकांशी नाळ जोडली आहे त्यांच्याबरोबर आहे. मला काय मिळाले यापेक्षा महाराष्ट्रातील जनतेला काय मिळणार हे महत्त्वाचे आहे, असे एकनाथ शिंदे यांनी म्हंटले आहे.

# ७३ तबलावादक उद्या शहरात उस्ताद झाकीर हुसेन यांना देणार अनोखी श्रद्धांजली



**छत्रपती संभाजीनगर :** पद्मविभूषण उस्ताद जाकीर हुसेन यांना श्रद्धांजली म्हणून ७३ तबलावादनातून श्रद्धांजली अर्पण करण्याचा अनोखा कार्यक्रम भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस च्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. रविवार दिनांक २२ डिसेंबर रोजी सायंकाळी सात वाजता तापडिया नाट्यमंदिर येथे हा कार्यक्रम होणार आहे.

पद्मविभूषण आणि जागतिक कीर्तीचे तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन हे वयाच्या ७३ व्या वर्षी आपल्यातून निघून गेले आहेत. आज ताल मुका झाल्यासारखा वाटतोय पण हा वारसा आपल्याला पुढे घेऊन जावा लागेल म्हणूनच भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेसने तबलावादनातूनच त्यांना आदरांजली वाहण्यासाठी ७३ तबलावादनातून श्रद्धांजली सभेचे आयोजन केले आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेसचे नेते व मुख्य आयोजक राजेश मुंढे, निमंत्रक महेश अचिंतलवार, समन्वयक सई बारबोटे यांनी केले आहे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे छायाचित्र लावण्यावरून गोंधळ

**नागपूर :** कॉंग्रेस नेते नाना पटोले, विजय वडेट्टीवार तसेच नितीन राऊत यांनी त्यांच्या संगणकासमोर डाॅ. बाबासाहेब आंबेडकरांचे छायाचित्र लावले होते. नितीन राऊत जयभीम लिहीलेली निळी टोपी घालून आले होते. त्यांच्यासह विरोधी बाकावरील इतरही सदस्यांनी आंबेडकरांची छायाचित्रे लावण्यात आली. त्यावरून सभागृहात चांगलाच गोंधळ झाला. दोन्ही बाजूकडून घोषणाबाजी झाल्याने ११.५५ वाजता सभागृह १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले.

मुंबईत कॉँग्रेस कार्यालयावर झालेल्या हल्ल्यासंदर्भात विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्ताव दिला होता. त्यावर अध्यक्षांनी स्थगन प्रस्तावाच्या तीन सूचना प्राप्त झाल्या आहे. त्या सर्व नाकारण्यात येत असल्याचे सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बाबासाहेब सर्वांचे होते. अध्यक्षांनी विरोधकांना बाबासाहेबांची छायाचित्रे लावण्याची परवानगी दिली असेल तर आम्हालाही सत्ताधाऱ्यांना द्यावी. आंबेडकरांची छायाचित्रे आमच्याही आसना समोर लावू द्या, अशी विनंती अजित पवार यांनी केली. त्यावर अध्यक्षांनी कोणतीही परवानगी दिलेली नाही. फलक, पोस्टर किंवा दैवतांची छायाचित्रे लावण्याची परवानगी नाही. कामकाजात अडथळा येईल असे काही विरोधकांनी करू नये. बाबासाहेब सर्वांच्या मनात आहे. कृपया छायाचित्रे काढावीत अशी विनंती अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.

११.५५ वाजता सभागृह दहा मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले. तहकुबीच्या दहा मिनिटात सत्ताधारी आणि विरोधी बाकांवरून डाॅ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषणा देण्यात येत होत्या. या दहा मिनिटात विधिमंडळाच्या पायऱ्यांवर करतात त्याप्रमाणे सत्ताधारी आणि विरोधी बाकावरून घोषणाबाजी करण्यात आली. आंबेडकरांचा दोनदा पराभव करणाऱ्या काँग्रेसचा निषेध असो अशा घोषणा सत्ताधारी बाकावरील सदस्यांनी दिल्या. दरम्यान सत्ताधारी बाकावरील सदस्यांनीही आंबेडकरांच्या छायाचित्रांची पोस्टर्स आणून आसनासमोर लावली.

तुम्ही सर्व सदस्य माझे ऐकण्याच्या मनस्थितीत दिसत नाही. सभागृहाचे वातावरण आणखी चिघळवण्यात अर्थ नाही. सभागृहाचे काम मी या वातावरणात सुरू करणार आहो. सर्व सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे अशी कडक भूमिका अध्यक्षांनी घेतली आहे. त्या नंतर नाना पटोले यांनी पाॅइंट ऑफ प्रोसीजर नुसार मुंंबईतील एका उच्चभ्रू साेसायटीतील मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. त्यावर अध्यक्षांनी पटोले यांना परवानगी नाकारली. सभागृहाचा एकेक मिनिट महत्वाचा आहे. सामान्य माणसांचा पैसा कामकाजासाठी खर्च होतो आहे असे सांगत अध्यक्षांनी पटोले यांना परवानगी नाकारली. समाजातील एका उच्चभ्रु सोसायटीत काय घडते आहे याच्याशी सभागृहाचा काय संबंध आहे असा सवाल अध्यक्षांनी केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ डिसेंबर २०२४


# कन्नड येथे नवभारत साक्षरता कार्यक्रम व हॅकेथॉन कार्यशाळा संपन्न




**कन्नड (अरुण थोरात):** नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत दि. १९ डिसेंबर रोजी कन्नड तालुका स्तरीय "उल्लास मेळावा" उत्साहात साजरा करण्यात आला. तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते साहित्य प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले.

तसेच योगेश मुळे व अजिज शहा यांनी तयार केलेल्या "कन्नड तालुका उल्लास विशेषांक २०२४" याचे विमोचन तहसीलदार श्री कडवकर, डॉ.प्रकाश मांटे अधिव्याख्याता डायट व गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ, शिवाजी महाविद्यालयचे प्रा.आहेर यांच्या हस्ते करण्यात आले.

हिवरखेडा गौ. येथील विद्यार्थीनींनी स्वागत गीत सादर केले. प्रस्तावीक गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ यांनी केले. यात सदर कार्यक्रमाची पार्श्वभूमी व अंमलबजावणी बाबत माहिती दिली.

देवगाव रंगारी येथील शाळेने पथनाट्य सादरीकरण केले. दाभाडी येथील स्वयंसेविका मुनीरा शहा यांनी मनोगत व्यक्त केले. नवसाक्षर अशोक सवई यांनी मनोगत व्यक्त केले. योगेश पाटील बहीरगाव यांनी नवभारत साक्षरता बाबत माहिती दिली. तहसीलदार श्री. कडवकर यांनी शिक्षणपद्धती बदलानुसार शिक्षकांनी स्वत: ला बदलावे.

इतर देशातील शिक्षण पद्धती व आपली शिक्षण पद्धती यामध्ये तुलना करताना जागतिक स्तरावरील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेण्याची तसेच इंग्रजी विषयाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. याबाबत त्यांनी विविध उदाहरणातून मागदर्शन केले.

डॉ.प्रकाश मांटे यांनी नवभारत साक्षरता कार्यक्रम अंमलबजावणी करतांना मिशन मोडवर हे काम करावे असे सुचवले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ प्रकाश मांटे होते. सुत्रसंचालन जि.प. प्रा. शाळा वडाळी येथील शिक्षक अजिज शहा यांनी केले तर आभार प्रदर्शन जि प कें.प्रा. शाळा औराळा चे मुख्याध्यापक योगेश मुळे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी विस्तार अधिकारी डी.टी.शिंदे, पंचायत समितीचे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत सर्व साधनव्यक्ती नितीन वाघ, झिंगराव सपकाळ, संदीप कुलकर्णी, श्रीमती अफरोज शेख, प्रशांत अहीरराव, विशेष शिक्षक शिवाजी घुले, कडूबा भुसारी, उत्तम आघाडे इ.नी प्रयत्न केले. कार्यक्रमात तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुख, विज्ञान शिक्षक, प्रदर्शन मांडणारे शिक्षक उपस्थित होते.

दुपार सत्रात विज्ञान विषयातील प्रकल्प व नाविन्यपूर्ण प्रयोग सादर करून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरापर्यंत यश संपादन करण्याकरिता हॅकेथॉन च्या माध्यमातून प्रयोग नोंदणी, प्रयोगाचे ऑनलाईन सादरीकरण व यासंबंधी स्पर्धेत संधीची उपलब्धता याबाबत जि.शि. व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता डॉ.प्रकाश मांटे, स्वप्निल बारहाते, श्री खाडे यांनी तालुक्यातील इ .६ वी ते ८ वी वर्गातील विज्ञान शिकविणाऱ्या शिक्षकांना मार्गदर्शन केले. तसेच शाळांची हॅकेथॉन मध्ये नोंदणी व स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विषय साधनव्यक्ती संदीप कुलकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन विषयसाधनव्यक्ती झिंगराव सपकाळ यांनी केले.

# पिशोर येथे भव्य करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

मराठवाडा युवा मंच
पिंपरी-चिंचवड, पुणे - ४११ ०३३

**कन्नड (अरुण थोरात):** युवक, विद्यार्थ्यांनी आपल्या भावी काळातील यशाची उज्ज्वल स्वप्ने पाहावीत व ती साध्य करण्यासाठी आपली संपूर्ण बुद्धि-शक्ती पणाला लावावी, युवकांमध्ये विजिगिषु इच्छा निर्माण करून ध्येयपूर्तीच्या दिशेने प्रयत्न व्हावेत, अभ्यास-यश, चौफेर व्यक्तिमत्व विकास, तसेच धैर्य निर्माण व्हावे तसेच कर्तृत्व, नेतृत्व, उद्योजकता, व्यवस्थापन इत्यादी विषय, विविध उपक्रमांच्या माध्यमातून साध्य करावा, या उद्देशाने मराठवाडा युवा मंच पुणे यांच्या वतीने दि. २१ डिसेंबर रोजी माळी समाज मंगल कार्यालय शफेपुर पिशोर ता.कन्नड येथे भव्य करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे येथील मराठवाडा युवा मंचच्या पुढाकाराने ध्येय व उद्दिष्टप्रमाने सामाजिक बांधिलकी जपत समाजासाठीचे कर्तव्य सद्भावना जाणीव ठेवून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी सकाळी ९ ते १ वा. वेळेत असणार आहे.

१० वी, १२ वी पदवीधर, डिप्लोमाधारक, सुशिक्षित बेरोजगार यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी व यशस्वी उद्योजक यांची उपस्थितीती असणार आहे. तरी सर्व विद्यार्थी, पालक यांनी करिअर मार्गदर्शन शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मराठवाडा युवा मंचचे पदाधिकारी, ग्रामपंचायत पिशोर, ग्रामपंचायत नादरपुर वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, विकास मीना (मुख्य कार्यकारी अधिकारी), अंजली धानोरकर (उपजिल्हाधिकारी), संतोष गोरड (उपविभागीय अधिकारी कन्नड), प्रशांत स्वामी (पोलिस उपायुक्त, गुन्हे शाखा), भूषण कदम (व्यवस्थापकीय संचालक पुणे), राजीव मुंदडा (नेत्रतज्ज्ञ संभाजीनगर), विद्याचरण कडवकर (तहसीलदार, कन्नड), चंद्रहार ढोकणे (गटविकास अधिकारी, पंचायत समिती कन्नड), अश्विनी लाटकर (शिक्षणाधिकारी, माध्य. संभाजीनगर) आदी अधिकारी-पदाधिकारी मार्गदर्शक म्हणून असणार आहेत.पिशोर, नाचनवेल, करंजखेड, चिंचोली लि. वासडी, भराडी परिसरातीलशाळा, विद्यालय, महाविद्यालये, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या स्पर्धकांनी, विद्यार्थी, पालक, शिक्षकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.







महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ डिसेंबर २०२४

# उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा ब्रिटिश काउन्सिलशी सहकार्य करार



**नागपूर :** संशोधन आणि शैक्षणिक गुणवत्तेसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ब्रिटिश काउन्सिलशी सहकार्य करार केल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी दिली.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ब्रिटिश काउन्सिलशी सहकार्य करार केला. या करारामुळे ऑक्सफर्ड, केंब्रीज, बर्मींगहॅम अशा नामांकीत विद्यापीठाशी शैक्षणिक सहकार्य करणे सहज शक्य झाले आहे. तसेच संशोधनामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढायला मदत होईल. बर्मींगहॅम विद्यापीठाशी राज्यातील पुणे, सीओईपी व जळगाव या तीन विद्यापीठांचा करार झाला. यामुळे ही विद्यापीठे कृत्रिम प्रज्ञा, आरोग्य व कृषी या क्षेत्रात संशोधन करणे सोपे झाले आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालय देशभरातील विद्यापीठे व शिक्षण संस्थांचे रँकींग करते. त्यात महाराष्ट्रातील फक्त मुंबई, पुणे व मराठवाडा विद्यापीठ अशा मोजकी विद्यापीठे आहे. या रँकींगमध्ये इतर विद्यपीठांचा समावेश का होत नाही याचा अभ्यास करण्यात येत आहे. याच्या प्राथमिक कारणांमध्ये संशोधाची गुणवत्तेची कमतरता आहे.

भारतीय मुले शिक्षणासाठी मोठ्या संख्येने विदेशात शिकायला जातात. आपल्याकडे शिक्षणातील लवचिकता नसल्याने असे होते. आपल्याकडे कोणत्या विद्याशाखेत कधी जायचे हे दहावी व बारावीत असतानाच ठरवावे लागते. विदेशात मात्र असे नाही. तिथे इतर कोणत्याही विद्या शाखेत शिकत असताना संबंधित विद्यार्थ्याला दुसऱ्या विद्याशाखेत जाण्याचे स्वातंत्र्य आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रम बदलाची लवचिकता आहे. त्यामुळे मुलांना मनाप्रमाणे विद्याशाखा निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. पण त्यासाठी आणखी काही कालावधी लागू शकतो. विद्यापीठीय शिक्षणातील उपयोगीता आणि कौशल्य यामध्ये कमी पडतो. यासाठी स्थानिक उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील जोड अधिक मजबूत झाला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याकरीता औद्योगिक इंटर्नशिप अनिवार्य करीत आहे. नॅकच्या मूल्यांकनामध्ये महाराष्ट्र आता पुढे आहे. सुमारे २३७५ संस्थांनी नॅक मूल्यांकन करून घेतले आहे.

# 'बामू'चा केंद्रीय युवक महोत्सव बुधवारपासून



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा केंद्रीय युवक महोत्सव येत्या २५ ते २८ डिसेंबर दरम्यान होत आहे. आतापर्यंत एकूण २९५ महाविद्यालयांनी नोंदणी केली आहे. महोत्सवात सुमारे दोन हजार कलावंत सहभागी होणार आहेत. तर युवा महोत्सवात सहभागी न होणाऱ्या ८१ महाविद्यालयांना विद्यापीठ प्रशासनाने १० हजार रुपये दंड आकारला आहे.

महोत्सवासाठी कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी प्रक्रिया ही ऑनलाईन ठेवण्यात आली होती . ७ ते १८ डिसेंबर या काळात महाविद्यालयांनी नोंदणी करुन हार्ड कॉपी विद्यार्थी कल्याण विभागात जमा केली. गेल्या १२ दिवसात ४७६ पैकी २९५ महाविद्यालयीन नोंदणी केली आहे. महोत्सवात २९५ महाविद्यालयांचे एकुण १ हजार ८८० कलावंत सहभागी होणार आहेत. यामध्ये १ हजार १३ विद्यार्थी तर ८६७ मुलींचा सहभाग आहे. तसेच २६८ पुरुष व १६८ महिला असे ४३६ संघ व्यवस्थापक आसणार आहेत. महाविद्यालयांना केलेला दंड भरावाच लागणार आहे. या संदर्भात कसलीही गय करण्यात येणार नाही, अशा सूचना कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी दिल्या आहेत.

दरम्यान गेल्या १० ते १२ वर्षांपासून जे महाविद्यालय युवक महोत्सवात सहभाग घेण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांची सत्यता पडताळणी करण्यासाठी तसेच कारण मीमांशा करण्यासाठी प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापना करण्यात येणार आहे.

# सोमनाथच्या मृत्यू प्रकरणी मुख्यमंत्री फडणवीसांनी सभागृहात चुकीची माहिती दिली : जितेंद्र आव्हाड



**नागपूर :** परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांचा रिपोर्टमध्ये मल्टिपल इन्जुरीचा उल्लेख असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात चुकीची माहिती दिली असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

जितेंद्र आव्हाड पुढे बोलताना म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांनी स्वत:ला मारुण घेतले की काय?. जिवंत पणी मेले म्हणूनच मल्टिपल इन्जुरीचा उल्लेख करण्यात आला. जुन्या जखमा असता तर तसा उल्लेख त्यामध्ये करण्यात आला असता. माझ्याकडे रिपोर्ट आहे तुम्हाला पाठवतो. तर संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड यांच्यावर कोणते गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. वाल्मीक कराड, धनंजय मुंडे यांना वाचवण्याचे काम हे सरकार करत आहे का?

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी एक हुशार माणूस त्यांचे निधन कसे झाले. मुख्यमंत्री फडणवीसांनी त्यांच्याबाबतीत गांभीर्याने निवेदन केले नाही. पोलिसांनी ज्या प्रकारे लोकांना मारले ते व्हिडिओ आहेत. पोलिसांना वाचवण्याचे काम त्यांनी केले आहे. पण १२ कोटी लोकांना न्याय देण्याचे काम त्यांनी केले नाही. सोमनाथ सूर्यवंशीला कुणी मारले हा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यांनी स्वत:ला मारुन घेतले का? मुख्यमंत्री फडणवीसांच्या निवेदनावर अध्यक्षांनी आम्हाला बोलू दिले नाही.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड यांच्यावर कोणते गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. वाल्मीक कराड, धनंजय मुंडे यांना वाचवण्याचे काम हे सरकार करत आहे का?, धनंजय मुंडे सरकारमध्ये आहे तुम्ही कसली वाल्मीक कराड यांची चौकशी करता. कुणासोबत फोटो असले तरी आम्ही त्याला सोडणार नाही, असे फडणवीस म्हणाले. पण आम्हाला माहिती आहे की कराडांचे फडणवीसांसोबत फोटो असले तरी त्यांचा आणि कराडांचा काही संबंध नाही. पण तुम्हाला असं म्हणायचे आहे का की धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचा काही संबंध नाही.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, कराड हा सिरीअल किलर आहे, तो विकृत माणूस आहे. धनंजय मुंडे समोर एसआटीचा अधिकारी तोंड उघडेल का?. ज्या खंडणीतून ही हत्या झाली ती या वाल्मीक कराड यानेच मागितली होती. तो जर मुख्य आरोपी आहे तर त्याला वाचविण्याचे कारण काय?, दुसरीकडे धनंजय मुंडे येऊन सांगतात कराड हा माझा खास माणूस आहे. ही महाराष्ट्राची फसवणूक झाली आहे.

परभणी जिल्ह्यातील घडलेल्या घटनेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सविस्तर निवेदन दिले. तसेच या प्रकरात मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला दहा लाख रुपयांची मदत राज्य सरकारच्या वतीने केली जाणार असल्याची घोषणा फडणवीस यांनी केली. मात्र, एखाद्या प्रकरणावर शंका उपस्थित होत असतील तर त्याची चौकशी व्हायला हवी. म्हणूनच या सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी केली जाणार असल्याची घोषणा देखील फडणवीस यांनी केली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायमूर्तींची समिती स्थापन करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. मात्र, सूर्यवंशीला पोलिस कोठडीत मारहाण झाल्याचा आरोप त्यांनी फेटाळला. त्याचे सर्व व्हिडिओ फुटेज उपलब्ध असल्याचा दावा देखील फडणवीस यांनी केला आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सूर्यवंशी यांना दोन वेळा न्यायाधीशासमोर उभे करण्यात आले होते. त्यावेळी पोलिसांनी मारहाण केली का? असा प्रश्नही त्यांना विचारण्यात आला होता. मात्र त्यांनी पोलिसांनी मारहाण केली नसलयाचे सांगितलं आहे. तसेच ते पोलिस कोठडीत असतानाचे सर्व व्हिडिओ फुटेज उपलब्ध आहेत. असा दावा देखील फडणवीस यांनी केला. वास्तविक सूर्यवंशी यांना श्वसनाचा दुर्धर आजार आहे. त्याचा उल्लेख त्यांच्या पोस्टमार्टम रिपोर्ट मध्ये लिहिलेला असल्याचे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तसेच त्यांच्या जुन्या जखमांचा देखील उल्लेख पोस्टमार्टम रिपोर्ट मध्ये असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. सूर्यवंशी यांना पोलिस कोठडीतून ज्यावेळी न्यायालयीन कोठडीत नेले गेले, त्यावेळी त्यांना जळजळ होत होती. तशी तक्रार सहकारी कैद्याने केल्यानंतर त्यांना हॉस्पिटलमध्ये देखील नेण्यात आले. हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर त्यांना मृत घोषित करण्यात आला असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.